

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

(स्वायत्त) कोल्हापूर

(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## इतिहास विभाग

## सूचना

१८/७/२०२५

महाविद्यालयातील इतिहास विभागामार्फत एम.ए.१ वर्षातील नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम मंगळवार दिनांक २२/०७/२०२५ रोजी रूम नंबर २०३ मध्ये आयोजित करण्यात आला आहे. तरी एम.ए.१ व २ च्या सर्व विद्यार्थ्यांनी सकाळी १०.३० वाजता उपस्थित राहावे.

**टीप:** कार्यक्रमानंतर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

18-7-25

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## इतिहास विभाग

### अहवाल : एम.ए. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम

२३/७/२०२५

महाविद्यालयातील इतिहास विभागामार्फत एम.ए. प्रथम वर्षातील नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत व मार्गदर्शनपर कार्यक्रम मंगळवार दिनांक २२/०७/२०२५ रोजी रूम क्रमांक २०३ येथे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास एम.ए. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर वातावरणात करण्यात आली. विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एम.ए. अभ्यासक्रमाची रूपरेषा, इतिहास विषयाचे व्यापक महत्त्व, संशोधनाच्या संधी तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असलेली शिस्त, अभ्यासाची सवय व वेळेचे नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच स्पर्धा परीक्षा, संशोधन व विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच प्रा. समृद्धी माने यांनी महाविद्यालयातील विविध सुविधा, ग्रंथालय व्यवस्था, अभ्यासिका, परीक्षा पद्धती याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातील शिस्त, नियमावली आणि जबाबदारी यांचे महत्त्वही पटवून दिले.

या कार्यक्रमामुळे नवागत विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी जुळवून घेण्यास मदत झाली तसेच त्यांच्या मनातील शंका दूर झाल्या. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

# एम.ए. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम -२२/७/२०२५










